सकाळ
पुणे, मंगळवार, १४ मे २०१९ ३

# पथनाट्य उपक्रमाचे आयोजन

**पुणे :** पोलिस यंत्रणेमार्फत नागरिकांना तत्काळ सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. अशा उपक्रमांची माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी पुणे पोलिस, पंख सामाजिक संस्था, क्विक हील फाउंडेशन यांच्या वतीने पथनाट्य उपक्रम राबविला जाणार आहे. त्याचे उद्घाटन पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या वेळी क्विक हील फाउंडेशनचे सी. एस. आर. प्रमुख अजय शिर्के, पंख संस्थेच्या स्मिता आपटे, कल्याणी भाबड उपस्थित होते. शहरातील ३० वस्त्यांमध्ये ही पथनाट्ये सादर केली जाणार आहेत.